## पुणे : 10/10/2022 मा संचालक सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य यांचेशी राज्यकार्यकारीणीने घेतलेली बैठक

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की आज 10/10/2022 सोमवार ला शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य चे वतीने सर्व सन्मानिय माननीय राज्याध्यक्ष श्री बाजीरावजी देशमुख साहेब, श्री राजीवजी जामोदकर साहेब, मी संतोष मलेवार सरचिटणीस, श्री बाळासाहेब जाधव चिटणीस,मुख्य सल्लागार श्री कमलाकर शेटे साहेब श्री सुरेश माने साहेब,विलास घाडगे साहेब श्री भुजबळ साहेब नवनिर्वाचित विभागीय उपाध्यक्ष श्री पठाण सर श्री भिल्लारे सर श्री सार्वे सर श्री कोरपे सर, श्री बिराजदार सर तसेच सर्व बाबीचे नियोजन करणारे श्री दिपक पाटील माजी चिटणीस यांचे समेत मा. सैनिक कल्याण विभाग संचालक श्री राजेश पाटील भा. प्र. से व माननीय आर आर जाधव सहायक संचालक यांची भेट घेऊन संघटने मार्फत सत्कार करण्यात आला तसेच संघटनेचे कर्मयोध्दे अंक देण्यात आले.

तसेच माननीय संचालक महोदय यांनी सविस्तर चर्चा करावी मी आपले करीताच आहे आपले कार्य करण्याची जी संधी मला मिळाली माझे सौभाग्य असल्याचे मत व्यक्त केले.

त्याप्रसंगी संघटनेचे वतीने खालील मुद्देवर चर्चा करण्यात आली.

1) पुनर्नियुक्त माजी सैनिक कर्मचारी यांना जुनी पेंशन योजना लागू करण्या बाबत.

2) आश्वासित प्रगती योजना 10,20,30 ऐवजी 5,10,15 लागु करणे.

3) माजी सैनिक कर्मचारी यांना बदली प्राधान्य क्रमात समाविष्ट करणे.

4) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत मध्ये पुर्वी प्रमाणे आरक्षण पुर्वरत करणे.

5) विरनारी यांना ससन्मान अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करणे.

तसेच माननीय उच्च न्यायालय नागपूर मार्फत सैनिक कल्याण विभाग पुणे यांना जुनी पेंशन योजना लागू करण्या बाबत चे उत्तर सादर करण्याचे दस्तावेज सादर करण्यात आले.

सर्व उपस्थित पदाधिकारी व या करीता अधक परिश्रम घेणारे श्री दिपक पाटील माजी चिटणीस यांचे सर्वाचे मनःपुर्वक आभार ....

**संतोष मलेवार सरचिटणीस शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य**